# दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

**म्युनिसिपल बँक भवन, २४५, पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

मुंबई, दिनांक : ११.०७.२०१८

# ६६ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ६६ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक सन्माननीय संचालक मंडळाच्या वतीने आपल्यापुढे सादर करण्यास मला आनंद होत आहे.

साल २०१७-२०१८ मध्ये बँकेने आर्थिक दृष्टया सर्वांगीण प्रगती साधली आहे. यावर्षी बँकेला रुपये ८०.१८ कोटी इतका ढोबळ नफा झाला असून त्यावर आयकरापोटी रुपये २९.५० कोटी अधिदान/तरतूद करुन बँकेस रुपये ५०.६८ कोटी इतका निव्वळ नफा झाला आहे. अहवाल सालामध्ये बँकेने केलेल्या प्रगतीचा गोषवारा पुढीलप्रमाणे :-

## १. अहवाल सालातील ठळक वैशिष्टये :

खाली नमूद केलेल्या तक्त्यावरुन बँकेने अहवाल वर्षात केलेल्या कामगिरीची कल्पना येते :-

**(रुपये कोटीत)**

| अ. क्र. | तपशील | आर्थिक वर्ष ३१.०३.२०१७ अखेरची रक्कम | आर्थिक वर्ष ३१.०३.२०१८ अखेरची रक्कम | निव्वळ वाढ (+)/ घट (-) |
|---|---|---|---|---|
| १. | भाग भांडवल | १७४.२४ | १५७.२३ | - १७.०१ |
| २. | ठेवी | ३१८६.१५ | ३२२६.०२ | + ३९.८७ |
| ३. | कर्जे | २१४४.४८ | २३४१.५३ | + १९७.०५ |
| ४. | खेळते भांडवल | ४०७१.१८ | ४१८४.७७ | + ११३.५९ |
| ५. | आयकर भरण्यापूर्वीचा नफा | ६९.५३ | ८०.१८ | + १०.६५ |
| ६. | आयकर भरल्यानंतरचा निव्वळ नफा | ४३.२५ | ५०.६८ | + ७.४३ |

अहवाल सालामध्ये बँकेचे भाग भांडवल रुपये १५७.२३ कोटी इतके झाले आहे. नाममात्र सभासदांना मिळणारे फायदे यापुढे उपलब्ध नसल्याने दिनांक २१.०८.२०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नाममात्र सभासदत्वाच्या बाबतीत पोटनियमात बदल करण्यात आलेला आहे. बँकेच्या खातेदारांना ठेवी तारणावर कर्ज घ्यावयाचे असल्यास, अशा खातेदारास नाममात्र सभासद करुन घेण्यात येईल. मात्र कर्जाची संपूर्ण परतफेड झाल्यावर नाममात्र सभासदत्व रद्द होईल. सदर बदलांमुळे नाममात्र सभासदांच्या भाग भांडवल खाती जमा असलेली रक्कम विशेष ठेव खाती वर्ग करण्यात आल्याने अहवाल साली भाग भांडवल रकमेत घट दिसते. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी रुपये १७.०१ कोटीने घट झाली आहे. गतसाली बँकेच्या ठेवी रुपये ३१८६.१५ कोटी इतक्या होत्या. यावर्षी सदर ठेवी रुपये ३२२६.०२ कोटी आहेत म्हणजेच गेल्या वर्षाच्या तुलनेत रुपये ३९.८७ कोटीने ठेवींमध्ये वाढ झाली आहे. पारंपारिक गुंतवणूकीचा पर्याय असणाऱ्या मुदत ठेवींकडे सर्वसामान्य गुंतवणूकदारांनी पाठ फिरविल्याचे दिसते. अहवाल साली बँकींग क्षेत्रात मुदत ठेवीमध्ये केवळ ६.७० टक्केने वाढ झाली आहे. मात्र म्युच्युअल फंडाना गुंतवणूकदारांनी अधिक पसंती दिल्याने मुदत ठेवींचे प्रमाण घटले आहे. दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ रोजी जाहीर झालेल्या नोटाबंदीनंतर रुपये ५००/- आणि १,०००/- च्या जुन्या नोटा

खातेदारांनी मोठया प्रमाणावर बँकेत जमा केल्यामुळे सदर आर्थिक वर्षात मुदत ठेवींच्या वाढीचा वेग जास्त होता. अहवाल साली इतर सहकारी बँकांनी ठेवीच्या व्याज दरात वाढ केली असल्यामुळे प्रामुख्याने आपल्याकडील पूर्वी जादा व्याज दराने स्विकारलेल्या ठेवी मोठे ठेवीदार मुदत संपल्यानंतर इतर बँकेत ठेवत आहेत. मात्र बँकेचे बहुतांशी आजी/माजी सभासद ठेवीदार बँकेवर अतूट विश्वास व बँकेबरोबर असलेल्या ऋणानुबंधामुळे इतर बँकांकडे जात नाहीत. अहवाल साली बँकेच्या ठेवींमध्ये रुपये ३९.८७ कोटीने वाढ झाली आहे. बँकेचा महत्तम ठेवी दर हा ७.५० टक्के आहे. मात्र अहवाल साली उपलब्ध निधीचे नियोजन कार्यक्षम पध्दतीने केल्यामुळे जितक्या ठेवींची आवश्यकता होती तितक्या ठेवी बँकेकडे उपलब्ध असल्याकारणाने ठेवींच्या व्याज दरात वाढ न करता, आहे त्या व्याज दरातच ठेवी संकलीत करण्याचे उद्दिष्ट बँकेच्या सर्व कर्मचारी/अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्याअनुषंगाने सातत्याने पाठपुरावा करुन सर्व कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे पर्याप्त ठेवी प्राप्त झाल्या. मात्र मोठया ठेवीदारांनी इतर बँकांच्या ठेवीच्या व्याज दरातील तुलनात्मक शुल्लक वाढ पाहून आपल्या बँकेतील मुदत ठेवी मुदत संपल्यानंतर इतर बँकांत ठेवण्याचा कल वाढलेला दिसत आहे. भविष्यात कर्जात होणारी वाढ लक्षात घेता, ठेवी संकलीत करण्याकरीता ठेवींवरील व्याज दरात वाढ करणे क्रमप्राप्त होईल.

यावर्षी आपल्या बँकेचे ४४९८ सभासद सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर सर्वसाधारणपणे सभासद त्याच्या जन्मगावी राहणे पसंत करतात. त्यामुळे अशा सभासदांची सक्तीची ठेव व इतर ठेवी मोठया प्रमाणात कमी होतात. तरीही बँकेचा ठेवीवृध्दीचा दर चांगला राहिला आहे. तसेच सेवानिवृत्तीनंतरही सभासदाचे बँकेबरोबरचे ऋणानुबंध कायम ठेवण्याकडे कल दिसत आहे.

यावर्षी कर्ज रकमेमध्ये रुपये १९७.०५ कोटीची वाढ होऊन गतवर्षी रुपये २१४४.४८ कोटी असलेली कर्जे यावर्षी रुपये २३४१.५३ कोटी झाली आहेत. सदर कर्जात ९.१९ टक्के वाढ झाली आहे. सन २०१७-२०१८ मध्ये बँकींग उद्योगामध्ये कर्जवृध्दी दर १० टक्के होता. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार, बँकेचा सी.डी. रेशो ७० टक्केपर्यंत असणे आवश्यक आहे. सदर रेशो हा बँकेच्या ठेवी, कर्जे, निधी यांच्याशी निगडीत असतो. दिनांक ३१.०३.२०१८ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बँकेचा सी.डी. रेशो ६४.७३ टक्के आहे.

मागील वर्षी रुपये ४०७१.१८ कोटी असलेले खेळते भांडवल यावर्षी रुपये ४१८४.७७ कोटी झाले आहे. म्हणजेच गेल्यावर्षीच्या तुलनेत खेळत्या भांडवलामध्ये रुपये ११३.५९ कोटींची वाढ झाली आहे. सदर वाढ २.७९ टक्के आहे. आर्थिक वर्षात कर्ज रकमेत रुपये १९७.०५ कोटी वाढ झाली असल्यामुळे कर्जावरील व्याज रकमेत रुपये २८.८३ कोटीने वाढ झाली आहे. गतवर्षी बँकेस रुपये ६९.५३ कोटी ढोबळ नफा झाला होता. मात्र यावर्षी सदर ढोबळ नफा रुपये ८०.१८ कोटी झाल्याने नफ्यामध्ये गतवर्षीपेक्षा रुपये १०.६५ कोटीची म्हणजेच १५.३२ टक्के वाढ दिसत आहे. यावर्षी बँकेस आयकर भरल्यानंतर निव्वळ नफ्यामध्ये रुपये ७.४३ कोटीने म्हणजेच १७.१७ टक्केने वाढ दिसत आहे.

ढोबळ नफ्यामध्ये झालेल्या वृध्दीमध्ये लेखांकन नमुना २२ नुसार डिफर्ड टॅक्स उत्पन्नापोटी गतवर्षी रुपये २.२५ कोटी व यावर्षी रुपये २.२४ कोटी रकमेचा समावेश आहे. परंतु सदर रक्कम बँकेचा प्रत्यक्ष नफा व करपात्र नफा यामधील असणाऱ्या तफावत रकमेवर होणाऱ्या नोशनल नफ्यापोटीची (Notional profit) आहे व सदर रकमेवर आयकरही भरावा लागत नाही. तसेच सदर रक्कम अन्य निधीमध्ये वर्ग करणेकरीता उपलब्ध नसते.

केंद्र सरकारने दिनांक २९.०३.२०१८ रोजी प्रसारीत केलेल्या अध्यादेशाद्वारे उपदान अधिनियम १९७२ मधील कलम ४ (३) मध्ये सुधारणा करुन उपदानाची मर्यादा रुपये २० लाख केली आहे. सदर सुधारणा दिनांक २९.०३.२०१८ पासून लागू करण्यात आली आहे. बँकेने सुधारीत उपदानाची रक्कम रुपये २० लाखाप्रमाणे आवश्यक असलेल्या तरतूदींची पुर्तता करण्याकरीता अहवाल वर्षात नफ्यातून रुपये ५.६० कोटी रकमेची उपदान निधीमध्ये तरतूद केली आहे.

**सभासद :-**

अहवाल वर्ष अखेर बँकेची सभासद संख्या ८५४३९ इतकी झाली आहे. गतसाली ही संख्या ८६४५२ होती. अहवाल वर्षात ४४९८ सभासद कमी झाले असून बँकेच्या परिवारात ३४८५ सभासद नव्याने सामील झाले आहेत. महापालिकेत नव्याने कर्मचाऱ्यांची नेमणूक सध्या होत नसल्याने नवीन सभासदांची संख्या जास्त वाढत नाही. सभासद नसलेल्या महापालिका कर्मचाऱ्यांना सभासद करुन घेण्याचे

प्रयत्न सुरु आहेत. तसेच नवीन होणाऱ्या सभासदाची एक सक्तीची ठेव प्राप्त झाल्यावर लगेच परतावा क्षमतेनुसार रुपये १२.५० लाखापर्यंत कर्ज सुविधा सभासदास उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेमध्ये नव्याने भरती होणाऱ्या सभासदास खूप सोयीचे होत आहे.

प्रत्येक सभासदाने शाखा कार्यालयात जाऊन आपल्या खात्यावर वारसाची त्याचप्रमाणे सध्या रहात असलेल्या वास्तव्याच्या पत्त्याची पुराव्यानिशी नोंद करावी व ती अद्ययावत ठेवावी. तसेच आपला भ्रमणध्वनी क्रमांक बचत खात्यावर नोंदवावा जेणेकरुन एसएमएस ॲलर्ट सुविधेचा लाभ सभासदास घेता येईल. बहुतांशी सभासदांची बचत खाती आपल्या बँकेमध्ये आहेत. ज्या सभासदांची बचत खाती आपल्या बँकेत नाहीत, त्या सभासदांची बचत खाती बँकेने शून्य शिलकेने उघडलेली आहेत, अशा सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधीत शाखेशी संपर्क साधून के.वाय.सी. नॉर्म्सनुसार संबंधीत कागदपत्रांची पुर्तता करुन सदर खाते नियमित करुन घ्यावे. ज्या सभासदांचे बँकेकडे अन्य बचत खाते असल्यास त्याने पत्राद्वारे सदर बचत खात्याची माहिती द्यावी जेणेकरुन असे बचत खाते सभासदाच्या सी.आय.एफ.बरोबर जोडण्यात येईल. अशा सभासदांचे 'नो फ्रील' खाते बंद करण्यात येईल. कारण एकाच सभासदाच्या एकाच नांवाची दोन बचत खाती ठेवता येत नाहीत. सन २०१३-२०१४ पासून सर्व सभासदांचे सक्तीच्या ठेवीवरील व्याज रक्कम व लाभांश रक्कम सभासदांच्या बँकेकडील बचत खात्यात जमा करण्यात येत आहे. आर्थिक वर्ष २०१५-१६ पासून सक्तीच्या ठेवीवरील व्याजावर उगमस्थानी कर कपात (TDS) करुन उर्वरीत रक्कम सभासदांच्या बचत खाती जमा करण्यात येत आहे. ज्या सभासदांचे अद्ययावत पत्ते बँकेकडे उपलब्ध आहेत अशा सभासदांना पोस्टाने वार्षिक अहवाल घरपोच पाठविण्यात आलेले आहेत. सभासदांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे पत्ते पिनकोडसहीत व भ्रमणध्वनी क्रमांक अद्ययावत नसल्यास करुन घ्यावेत, जेणेकरुन बँकेला त्यांच्याशी संपर्क करणे व खात्याच्या व्यवहाराची माहिती मोबाईल मेसेज सेवेमार्फत देणे शक्य होईल.

## संगणकीकरण :

### (अ) एस.एम.एस. ॲलर्ट सेवा :

खातेदारांच्या खात्यावर व्यवहार झाल्यावर सदर व्यवहाराची त्वरीत माहिती खातेदारास प्राप्त व्हावी म्हणून भ्रमणध्वनीवर एस.एम.एस. ॲलर्ट सुविधा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सध्या सदर सुविधेअंतर्गत खात्यावर नांवे टाकण्यात आलेल्या किंवा जमा करण्यात आलेल्या व्यवहाराची, महापालिका कर्मचाऱ्यांचे वेतन जमा झाल्यावर त्याची माहिती, सभासदांचे मंजूर कर्ज बचत खात्यामध्ये जमा केल्याची माहिती, मुदत ठेवी मुदतपूर्ण होण्याची माहिती तसेच बँकेविषयीची आवश्यक माहिती, खातेदाराला उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर सुविधा सभासद/ग्राहकांना कोणतेही शुल्क न आकारता देत आहोत. ज्या सभासदांनी आपला भ्रमणध्वनी क्रमांक बँकेच्या खात्यावर नोंदविला नसेल त्यांनी आपले खाते असलेल्या शाखेत तो नोंदवावा, जेणे करुन बँकेला उपरोक्त सेवा देणे शक्य होईल. सध्या बहुतांशी भ्रमणध्वनीधारक ग्राहक नव्याने बाजारात उतरलेल्या कंपन्यांची सेवा स्विकारीत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक बदलला जातो. परंतु अशा बदलाची बँकेत कल्पना देण्यास विलंब होतो. दरम्यानच्या काळात बँकेतील एस.एम.एस. अलर्ट सुविधेपासून सभासद/ग्राहक वंचित राहतो. सर्व सभासद/ग्राहकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या भ्रमणध्वनी क्रमांकात बदल झाल्यास त्याची त्वरीत नोंद बँकेच्या दफ्तरी करण्यात यावी जेणेकरुन खात्यातील व्यवहाराची माहिती मिळणे शक्य होईल.

### (ब) स्वतंत्र कर्ज आज्ञाप्रणाली :

बँकेने कर्ज घेणाऱ्या सभासदांसाठी त्यांचे कर्जाचे अर्ज संगणक आज्ञाप्रणालीव्दारे संगणकामार्फत भरुन देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ज्याव्दारे सभासदाला त्यांच्या कर्जअर्जाबाबतची माहिती छापील स्वरुपात प्राप्त होते. सदर सुविधेचा लाभ सर्व सभासदांना होत आहे. विशेषत: अशिक्षित सभासदांना जास्त लाभ होत आहे. तसेच या आज्ञाप्रणालीमुळे कर्ज अर्जांची छाननी जलदगतीने होण्यास मदत होत असून त्याचा लाभ सभासदांस होत आहे. सदर सुविधेमुळे सभासदास कर्ज मिळणेबाबतची माहितीही जलदगतीने देणे शक्य झाले आहे.

### (क) व्यक्तिगत नावाचे धनादेश सुविधा :

ग्राहकांना व्यक्तिगत/खात्याचे नांव असलेले धनादेश पुस्तिका (Personalised Cheque Book) केंद्रीय पध्दतीने देण्याची सुविधा उपलब्ध आहे.

### (ड) MPLS Link :-

बँकेने भविष्यात होऊ घातलेल्या योजनांचा विचार करुन स्वत:ची एमटीएनएलची एमपीएलएस लिंक स्थापित केली आहे. ज्यायोगे कोअर बँकेचे व्यवहार जलदगतीने होत आहेत तसेच बँकेने स्वत:च्या लिंकव्दारे स्वतंत्र कर्ज आज्ञाप्रणाली स्थापित केली आहे. आस्थापना विभागाची आज्ञाप्रणाली, स्वत:चे ई-मेल सोल्युशन सुविधा सुरु करण्यात आली आहे. सर्व शाखा कार्यालयास, अधिकाऱ्यांस स्वतंत्र ई-मेल देण्यात आला आहे. बँकेच्या वेबसाईटवर सदर ई-मेल उपलब्ध करण्यात आले आहेत. ग्राहकांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे ई-मेल आय.डी. शाखेमध्ये जाऊन खात्यामध्ये नोंदवावेत जेणेकरुन खात्याविषयी सर्व माहिती, तक्रार निवारण इत्यादी बँकेला जलद व सुलभरित्या पोहोचविणे शक्य होईल व ग्राहकाचा अमूल्य वेळ वाचेल.

### (इ) बँकेची वेबसाईट :-

बँकेने स्वत:ची www.municipalbankmumbai.com ही वेबसाईट तयार केली असून सदर वेबसाईटवर कर्ज नियम, कर्जांचे व ठेवींचे व्याज दर, संचालक मंडळ, स्वास्थ्य निधी नियम, पोटनियमात होणारे बदल, बँकेची आर्थिक स्थिती, बँकेमध्ये होणारे बदल, निविदा सूचना, कर्मचारी/अधिकारी भरती प्रक्रियांचा तपशील इत्यादी माहिती सभासदांसाठी उपलब्ध करुन दिली आहे. सर्व शाखा कार्यालयांचे ई-मेल आय.डी., दूरध्वनी क्रमांक, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दूरध्वनी व ई-मेल आयडी उपलब्ध आहेत. सभासदांनी सदर वेबसाईटवरील माहितीचा उपयोग करुन घ्यावा.

### (उ) KIOSK मशिनची स्थापना :-

बँकेतील बचत खातेदारांना त्यांच्या बचत खात्यातील शिल्लक रक्कमेची माहिती मिळणे, मिनी स्टेटमेंट, पासबुक अद्ययावत करणे इत्यादी सुविधा KIOSK मार्फत देण्यात आलेल्या आहेत. सदर KIOSK मशिन बँकेतील जी/साऊथ, परळ, भायखळा, चेंबूर व बोरीवली शाखेत स्थापित करण्यात आलेल्या आहेत.

**(ऊ) १५ जी/ १५ एच आज्ञाप्रणाली -** बँकेच्या ग्राहकांना पूर्वी १५ जी/ १५ एच् फॉर्म्स स्वहस्ते भरुन द्यावे लागत होते. याकरीता बँकेने स्वतंत्र अशी आज्ञाप्रणाली विकसित केली आहे, ज्याद्वारे ग्राहकांना १५जी/ १५ एच् फॉर्म्स छापील स्वरुपात सर्व माहितीसह संबंधीत शाखेमध्ये उपलब्ध होतात. त्यावर स्वाक्षरी करुन बँकेचे ग्राहक सदर फॉर्म्स संबंधीत शाखेत त्वरीत जमा करु शकतात.

**(ए) Central Know Your Customer (C-KYC) -** बँकेने रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार सी-केवायसी आज्ञाप्रणाली अद्ययावत केली आहे ज्याद्वारे नवीन सभासदांचे खाते उघडताना त्यांनी सादर केलेले के.वाय.सी. ओळखपत्रांची माहिती थेट सी-केवायसी आज्ञाप्रणालीद्वारे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या CERSAI पोर्टलवर लोड करण्यात येते व ती अधिकृत झाल्यानंतर युनिक सी-केवायसी क्रमांक बँकेस प्राप्त होईल. सदर सी-केवायसी क्रमांक बँकेच्या खातेदारास भविष्यात बँकेत कोणताही व्यवहार करताना इतर बँकेत खाते उघडताना उपयुक्त ठरेल. उपरोक्त नंबर असल्यास ग्राहकाला केवायसी ओळखपत्र पुन्हा देण्याची आवश्यकता भासत नाही. तसेच सदर क्रमांक ग्राहकांकडे असल्यास आपल्या बँकेला सुध्दा नव्याने केवायसी ओळखपत्र घेण्याची आवश्यकता नसते.

**(ऐ) सामाजिक जबाबदारी –** जकात संकलन केंद्र बंद झाल्यानंतर त्या केंद्रांवर नादुरुस्त अवस्थेत असलेल्या यु.पी.एस. बॅटरीज तसेच शाखेतील वापरात नसलेले जुने संगणक व संगणकेतर सामुग्री यांचे योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याकरीता व सदर यु.पी.एस. बॅटरीज व संगणक सामुग्री पर्यावरणाचा ऱ्हास न करता योग्यप्रकारे नष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मान्यताप्राप्त संस्थेला सदर बॅटरीज व संगणक सामुग्री विकण्यात आल्या. याकरीता सदर संस्थेने बँकेला पर्यावरण संतुलनाचे प्रमाणपत्र प्रदान केले आहे. अशा प्रकारे बँकेने नादुरुस्त यु.पी.एस. बॅटरीज व संगणक सामुग्री यांची योग्य विल्हेवाट करुन पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सामाजिक जबाबदारी पार पाडली.

### (ओ) National Payment Corporation of India (NPCI) –

एन.पी.सी.आय. द्वारे भारतात अंमलात असलेल्या व भविष्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या अधिदान पध्दतीत सुसूत्रता आणण्याच्या हेतूने एन.पी.सी.आय. ची स्थापना झाली असून भारतातील सर्व बँकांनी त्यांचे सभासदत्व स्विकारले असून आपल्या बँकेने देखील एन.पी.

सी.आय.चे थेट सभासदत्व स्विकारले आहे. एन.पी.सी.आय. द्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधा बँक सभासद/ ग्राहकांपर्यंत पोहोचवित आहे. एन.पी.सी.आय. द्वारे रोखविरहीत व्यवहारांबाबत दरमहा सादरीकरण पाठविण्यात येते ज्याद्वारे रोखविरहीत व्यवहार करणाऱ्या अशा १० मोठया नागरी बँकांच्या क्रमवारीमध्ये बँकेचा क्रमांक असून, सदर बाब बँकेकरीता भूषणावह आहे.

**१) ए.टी.एम. सेवा रुपे कार्डशी संलग्नित –** आपली बँक रुपे कार्डची सभासद असल्यामुळे बऱ्याच सभासदांना याचा फायदा झाला आहे. रोखरहीत व्यवहारास प्रोत्साहन देण्यासाठी बँकेने खातेदारांना २४ तास रोख रक्कम काढण्याची सेवा देण्यासाठी बँकेच्या मुलुंड, सायन, भायखळा, वांद्रा, परळ, बोरीवली, नायर हॉस्पिटल, चेंबूर या आठ शाखांमध्ये तसेच वरळी इंजिनिअरींग हब व कापूरबावडी, ठाणे येथे बँकेने ए.टी.एम्. स्थापित केलेली आहेत. तसेच बँकेने एन्.पी.सी.आय्. चे थेट सभासदत्व मिळविल्यामुळे ग्राहकांसाठी रुपे कार्ड वितरीत केलेले आहे. त्यामुळे बँकेचे ग्राहक भारतातील एन्.पी.सी.आय्.शी (रुपे) संलग्न असलेल्या सुमारे २,३९,४९२ ए.टी.एम्. द्वारे व्यवहार करु शकतील. तरी सदर सेवेचा बँकेतील ग्राहकांनी लाभ घ्यावा. ए.टी.एम्. कार्डधारक नसल्यास त्वरीत कार्ड प्राप्तीसाठी संबंधित शाखेत संपर्क साधावा.

- ❖ DFS (Discover Financial Switch) : सदर सुविधा बँकेत सुरु झाली असून डायनर्स क्लब इंटरनॅशनलद्वारे परदेशातील व्यक्तीदेखील आपल्या बँकेतील ए.टी.एम्.द्वारे व्यवहार करु शकतात.
- ❖ बँकेने ग्राहकांसाठी एन्.पी.सी.आय्.ची E-Commerce सुविधा सुरु केली असून सदर सुविधेअंतर्गत बँकेतील ग्राहक त्यांचे भ्रमणध्वनी/ टेलिफोन, गॅस, वीज देयके भरणे इत्यादी तसेच इतर ऑनलाईन व्यवहार करु शकतात.
- ❖ पॉस सुविधा (Point of Sale) - आपल्या ग्राहकाला डेबीट कार्डद्वारे भारतातील कोणत्याही आस्थापनेमधून रोखविरहीत व्यवहार करणे शक्य व्हावे म्हणून एन.पी.सी.आय. च्या सहकार्याने बँकेने दिनांक १७.०४.२०१४ पासून पॉस सुविधा बँक ग्राहकांना उपलब्ध केलेली आहे. आपला ग्राहक डेबीट कार्डद्वारे भारतात कोठेही आस्थापनामध्ये (पेट्रोल पंपासहीत) २७,४०,६७१ टर्मिनल्सद्वारे रोखविरहीत व्यवहार करु शकतो. सदर बाब ग्राहकांना अतिशय सोयीचे झाल्याने आपल्या ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे व सदर व्यवहारामध्ये दिवसेगणिक लक्षणीय वृध्दी होत आहे.

**2) Cheque Truncation System (C.T.S)** - भारतीय रिझर्व्ह बँकेने सी.टी.एस. २०१० या प्रणालीअंतर्गत बँकेच्या ग्राहकांकडून जे धनादेश (Cheques) समाशोधनासाठी (Clearing) रिझर्व्ह बँकेत पाठविले जातात त्याऐवजी धनादेशाची प्रतिकृती (Image) संगणक आज्ञाप्रणालीद्वारे पाठविली जाते. त्यानुसार बँकेने ग्राहकांसाठी सी.टी.एस. २०१० प्रणालीद्वारे धनादेश ग्राहकांना उपलब्ध करुन दिले आहेत.

**3) National Automated Clearing House (NACH)** - बँकेने सदर सुविधा कार्यान्वित केली असून ई.सी.एस. प्रणालीप्रमाणे त्यांची कार्यशैली असून त्याअंतर्गत ग्राहकांना सध्या गॅस सबसिडी तसेच इतर देयके प्राप्त होतात. ग्राहक उपरोक्त सुविधेअंतर्गत इतर ठिकाणी असलेली कर्ज रक्कम, म्युच्युअल फंड गुंतवणूक, वीज व इतर देयक नियमितपणे पाठवू शकतात. तरी सदरबाबतचा मॅनडेट अर्ज भरताना खातेदारांनी आपले खाते क्रमांक, नांव व बँकेचा तपशील व्यवस्थित भरण्याची काळजी घ्यावी.

**४) मोबाईल बँकींग/आय.एम.पी.एस. (IMPS) सुविधा :-**

बँकेत मोबाईल बँकींग सुविधा कार्यान्वित असून सदर सुविधेअंतर्गत बँकेच्या खातेदाराला बँकेच्या मोबाईल ॲपद्वारे स्वत:च्या खात्यावरील रक्कम आपल्या बँकेच्या तसेच अन्य बँकेच्या दुसऱ्या खातेदाराच्या खात्यात एन.ई.एफ.टी./आय.एम.पी. एस. द्वारे ट्रान्सफर करता येते. याचबरोबर इतर बँकेतील ग्राहक आपल्या बँकेतील ग्राहकांच्या नांवे रक्कम थेट ट्रान्सफर करु शकतात. उपरोक्त सुविधेद्वारे बँकेच्या खातेदाराना आपल्या खात्यावरील शिल्लक रकमेची माहिती व मिनी स्टेटमेंट ॲपद्वारे उपलब्ध होते.

**पंतप्रधान सुरक्षा विमा योजना/पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना :**

ज्या सभासद/ठेवीदारांनी सदर योजनेचा लाभ घेतला असेल त्या सभासदांनी/ठेवीदारांनी प्रतिवर्ष विमा हप्ता रकमेचे नुतनीकरण करावे अशी विनंती करण्यात येत आहे.

**महापालिका कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतन वितरणाचे काम :**

महापालिका तसेच अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांच्या कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन वाटप बचत खात्याद्वारे करण्यात येत आहे. साधारणपणे ३१००० कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन वितरणाचे काम बँकेतर्फे केले जाते. सदर वेतन वाटप महापालिकेकडून कोणतेही शुल्क न घेता केले जाते. बँकेच्या सर्व शाखा कार्यालयांमध्ये कोअर बँकींग सुविधा उपलब्ध असल्याने वेतन वाटपाचे काम सुलभपणे होत असून सभासद कोणत्याही शाखेतून बचत खात्यामार्फत आपल्या मासिक वेतनाचे पैसे काढू शकतात व ए.टी.एम. सेवा सर्व बँकांशी संलग्न असल्यामुळे सभासदांना रोख व्यवहार करणे आणखी सुलभ झाले आहे व घराजवळील कोणत्याही बँकांच्या ए.टी.एम. मधून पैसे काढणे शक्य झाले आहे. आपल्या ज्या सभासदांची वेतनाची बचत खाती अन्य बँकेत आहेत त्या सर्व सभासदांना आम्ही विनम्र आवाहन करतो की, त्यांनी आपले वेतनाचे बचत खाते आपल्या बँकेत उघडावे व ए.टी.एम. कार्डद्वारे आपल्या घराजवळील कोणत्याही ए.टी.एम. मधून जोखीमरहीत व्यवहार करावेत.

## २. अहवाल वर्षातील बँकेच्या व्यवहाराची प्रगती :-

दिनांक ३१ मार्च २०१८ च्या ताळेबंदाचा गोषवारा **(रुपये कोटीत)**

| तपशील | ३१.३.२०१७ | ३१.३.२०१८ | तपशील | ३१.३.२०१७ | ३१.३.२०१८ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १७४.२४ | १५७.२३ | रोकड, इतर बँकातील जमा | २७७.५९ | १७१.६६ |
| राखीव निधी व इतर निधी | ३२५.४० | ३६४.६८ | कर्जरोख्यात व इतर गुंतवणूक | १४३८.३६ | १४४५.८९ |
| ठेवी | ३१८६.१५ | ३२२६.०२ | कर्जे | २१४४.४८ | २३४१.५३ |
| इतर देणी आणि तरतूद (दुबेरजेसहीत) | ३२९.६० | ४१९.४१ | व्याज येणे | १८.६१ | २३.३८ |
| मागील वर्षाच्या जादा तरतूदीसह नफा | ५५.७९ | १७.४३ | फर्निचर, इमारत, संगणक व वाहन | ६.३७ | ६.२७ |
| -- | -- | – | डिफर टॅक्स येणे | १३.९८ | १६.२२ |
| -- | -- | – | इतर येणी (दुबेरजेसहीत) | १७१.७९ | १७९.८२ |
| **एकूण :** | **४०७१.१८** | **४१८४.७७** | **एकूण :** | **४०७१.१८** | **४१८४.७७** |

## ३. ठेवींची वर्गवारी :-

**(रुपये कोटीत)**

| | | ३१ मार्च २०१७ | | | ३१ मार्च २०१८ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | ठेवींचे प्रकार | सभासदांकडून | बिगर सभासदांकडून | एकूण | सभासदांकडून | बिगर सभासदांकडून | एकूण |
| १. | सक्तीच्या ठेवी | ९८२.८१ | – | ९८२.८१ | ९१९.१७ | १०१.९१ | १०२१.०८ |
| २. | मुदतीच्या ठेवी | ८०५.६६ | ८२८.२१ | १६३३.८७ | ३४४.६८ | १३६९.६९ | १७१४.३७ |
| ३. | बचत ठेवी | ३७९.५४ | १२०.५७ | ५००.११ | २०७.११ | २५९.६१ | ४६६.७२ |
| ४. | आवर्त ठेवी | ८.३४ | ९.५५ | १७.८९ | ५.१८ | १३.९३ | १९.११ |
| ५. | चालू ठेवी | - | ५१.४७ | ५१.४७ | – | ४.७४ | ४.७४ |
| | **एकूण** | **२१७६.३५** | **१००९.८०** | **३१८६.१५** | **१४७६.१४** | **१७४९.८८** | **३२२६.०२** |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता निदर्शनास येते की, अहवाल सालामध्ये बँकेच्या एकूण ठेवी रुपये ३९.८७ कोटीने वाढल्या आहेत. बँकेच्या ठेवींवरील व्याज दर राष्ट्रीयकृत व खाजगी बँकेच्या ठेवीदारांइतकेच असले तरी ठेव वृध्दी झालेली आहे. यावर्षी देखील बँकेने सक्तीच्या ठेवीवरील व्याज दिनांक ०१.०४.२०१८ रोजी सभासदांच्या बँकेतील बचत खात्यात जमा केलेले आहे.

**सूचना :-** जे सभासद सक्तीच्या ठेवीवरील व्याज आपल्या सक्तीच्या ठेव खात्यात जमा करु इच्छितात, अशा सभासदांनी बँकेस पत्र दिल्यास त्यांचे व्याज सक्तीच्या ठेव खात्यात जमा करण्यात येईल. ज्यांनी सदर खाते (ॲक्टीव्ह) कार्यान्वित केले नाही त्यांनी त्यांची के.वाय.सी. कागदपत्रे सादर करुन सदर खाते कार्यान्वित करावे जेणेकरुन लाभांश रक्कम अधिदानास कोणतीही अडचण येणार नाही.

## ठेवींचे व्याज दर :-

बँकेचे सद्याचे दिनांक २७.१२.२०१७ पासून ठेवीवरील व्याज दर खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | ठेवींचे प्रकार | कालावधी | व्याज दर | |
|---|---|---|---|---|
| १. | बचत खाते | | ४.००% | ४.००% |
| | | | सर्वसामान्य नागरीक | वरिष्ठ नागरीक |
| २. | मुदत ठेवी | ७ दिवस ते ९० दिवस | ४.२५% | ४.२५% |
| | | ९१ दिवस ते १८० दिवस | ४.७५% | ४.७५% |
| | | १८१ दिवस ते १ वर्षापर्यंत | ५.००% | ५.००% |
| | | १ वर्षापेक्षा जास्त ते २ वर्षापर्यंत | ७.००% | ७.५०% |
| | | **१५ महिने (विशेष ठेव योजना)** | **७.५०%** | **७.७५%** |
| | | २ वर्षापेक्षा जास्त ते ३ वर्षापर्यंत | ६.७५% | ७.२५% |
| | | ३ वर्षापेक्षा जास्त ते ५ वर्षापर्यंत | ६.५०% | ७.००% |
| | | ५ वर्षापेक्षा जास्त ते १० वर्षापर्यंत | ६.००% | ६.५०% |

ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या वयाच्या पुराव्यादाखल पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, ज्येष्ठ नागरीक कार्ड इत्यादींपैकी एकाची छायांकित प्रमाणित प्रत द्यावी लागेल. वरिष्ठ नागरिकांना (६० वर्षावरील) एका वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता मुदत ठेव ठेवल्यास नियमित व्याज दरापेक्षा ०.५० टक्के व्याज दर लागू राहील. मात्र १५ महिने (विशेष ठेव) योजनेमध्ये वरिष्ठ नागरिकांना ०.२५ टक्के अधिक व्याज दर तसेच रुपये १ कोटी व त्यापेक्षा जास्त एकरकमी ठेवीवर ०.२५ टक्के अधिक व्याज दर लागू राहील.

## ठेवी विमा हप्ता :-

बँकेने डिपॉझिट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ॲक्ट १९६१ च्या तरतुदीनुसार सन २०१७-१८ या वर्षाची ठेव विमा हप्त्याची रक्कम विहित मुदतीत कॉर्पोरेशनकडे जमा केली आहे.

## ४. भाग भांडवल :-

गेल्या वर्षी रुपये १७४.२४ कोटी असलेले भाग भांडवल यावर्षी रुपये १५७.२३ कोटी इतके झाले आहे. भाग भांडवलामध्ये रुपये १७.०१ कोटीने घट झालेली आहे. याचे कारण म्हणजे नामधारी सभासदत्व रद्द झाल्यामुळे बँकेकडील नामधारी सभासदांचे भाग भांडवल विशेष ठेव योजनेत वर्ग करण्यात आले आहे.

## ५. राखीव व इतर निधी :-

गतसाली रुपये ३२५.४० कोटी असलेले बँकेचे राखीव निधी या वर्षात रुपये ३६४.६८ कोटी असून राखीव निधीमध्ये रुपये ३९.२८ कोटीने वाढ झालेली आहे. सदर वाढ १२.०७ टक्के आहे.

## ६. कर्जव्यवहार :-

### (अ) मध्यम मुदत कर्ज :

गतसाली रुपये २१४४.४८ कोटी असलेली कर्जे यावर्षी रुपये २३४१.५३ कोटीपर्यंत वृध्दींगत झाली आहेत. कर्जामध्ये एकूण रुपये १९७.०५ कोटींची वाढ झाली असून सदर वाढ ९.१९ टक्के आहे.

सध्याचे विविध कर्जावरील व्याज दर खालील प्रमाणे आहेत :

**कर्जाचे व्याज दर**

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | व्याज दर |
|---|---|---|
| १ | तातडीचे कर्ज | ११.०० टक्के |
| २. | सक्तीच्या बचत ठेवीवरील कर्ज | ९.५० टक्के |
| ३. | मध्यम मुदत कर्ज<br>मंजूर कर्ज रक्कम रुपये ३.२५ लाखापर्यंत<br>मंजूर कर्ज रक्कम - रुपये ३.२५ लाखापेक्षा जास्त<br>परंतु रुपये १२.५० लाखापर्यंत | <br>१२.७५ टक्के<br><br>१३.०० टक्के |
| ४. | विमा तारणावरील कर्ज/राष्ट्रीय बचत पत्रावरील कर्ज | १३.०० टक्के |
| ५. | गृहनिर्माण कर्ज | ८.५० टक्के |
| ६. | उच्च शैक्षणिक कर्ज | १०.०० टक्के |
| ७. | वाहन कर्ज | १०.०० टक्के |
| ८. | मॉर्गेज कर्ज | १३.०० टक्के |
| ९. | विशेष मुदत कर्ज | १३.०० टक्के |

**सभासदांना मंजूर केलेल्या कर्जाचा तपशील**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | कर्जांचे प्रकार | २०१६-२०१७ | | २०१७-२०१८ | |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर झालेले अर्ज | कर्ज रक्कम रुपये | मंजूर झालेले अर्ज | कर्ज रक्कम रुपये |
| १. | मध्यम मुदतीचे कर्ज | २१९३० | ११०२.०६ | २०६२८ | १३३४.१० |
| २. | तातडीचे कर्ज | २०४६२ | १५४.११ | १९५४० | १४८.०३ |
| ३. | गृहनिर्माण कर्ज | ९ | ०.८५ | ८ | ०.९१ |
| ४. | उच्च शैक्षणिक कर्ज | ६ | ०.२१ | ४ | ०.१३ |
| ५. | वाहन कर्ज | १ | ०.४४ | ६ | ०.०८ |
| ६. | विशेष मुदत कर्जे | ३ | ०.३० | १ | ०.०६ |
| | **एकूण** | ४२४११ | १२५७.९७ | ४०१८७ | १४८३.३१ |

**मध्यम मुदत कर्जाची कमाल मर्यादा :**

यापूर्वी बँकेत सभासदत्वाच्या कालावधीप्रमाणे कर्ज मंजूर करण्यात येत होते. मात्र दिनांक १८.११.२०१६ पासून सभासदाच्या पगारपत्रकातून एक वसुली प्राप्त होताच त्यांच्या परतफेडीच्या क्षमतेनुसार जास्तीत जास्त रुपये १०.०० लाखापर्यंत कर्ज मंजूर करण्यात येत होते. माहे मे २०१८ मध्ये झालेल्या संचालक मंडळ सभेतील निर्णयानुसार दिनांक १८.०६.२०१८ पासून मध्यम मुदत कर्जाची कमाल मर्यादा रुपये १०.०० लाख रकमेवरुन वाढवून रुपये १२.५० लाख करण्यात आली आहे. तरी सभासदांनी वाढीव कर्ज मर्यादेचा नियमासापेक्ष लाभ घ्यावा.

**टीप** : मात्र कर्जाची कमाल मर्यादा ठरविताना सभासदाच्या हातात १/४ पगार मिळेल याची खात्री करुन कर्ज मंजूर करण्यात येते. सदर १/४ गणना करताना एकूण पगारामध्ये समाविष्ट असलेले हंगामी भत्ते तसेच अतिकालिक भत्ता (Overtime) वगळून कर्ज रक्कम रु.१०० च्या पटीत मंजूर करण्यात येते.

**मध्यम मुदत कर्ज नियमातील बदल :-**

आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये बँकेच्या अनुत्पादीत कर्जात वाढ झाल्याचे दिसून येते. यामध्ये दिनांक ०५.०५.२००८ नंतर महापालिका सेवेत रुजू झालेले (डीसी-१) सभासदांच्या बाबतीत दिनांक ०१.०५.२०१५ ते दिनांक ३०.०९.२०१६ या कालावधीत जामिनदार ऐच्छिक करुन जामिनकी हमी निधी घेऊन मध्यम मुदत कर्जाचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. परंतु सदर कालावधीत डीसी-१ सभासदांना मंजूर केलेल्या कर्ज खात्यांपैकी अनुत्पादीत कर्ज होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले असून सभासद कामावर अनियमित येणे हे अनुत्पादीत कर्जाचे प्रमाण वाढण्याचे प्रमुख कारण असल्याचे दिसून येते. यास्तव, बँकेची कर्जे सुरक्षित करण्याच्या दृष्टीने मध्यम मुदत कर्ज नियमात दिनांक १८.०६.२०१८ पासून पुढीलप्रमाणे बदल करण्यात आला :-

डीसी-१ सभासदांना रुपये ७.५० लाख कर्ज मर्यादेपर्यंत मध्यम मुदत कर्ज मंजूर करताना पगाराचे खाते बँकेत असणे आवश्यक तसेच एक जामिनदार घेणे आवश्यक केलेले आहे. (एक जामिनदार दोन कर्जास जामिन राहू शकतो) व जामिनकी हमी निधी दर हजारी रुपये ५/- प्रमाणे घेण्यात येईल. तसेच कर्ज मर्यादा रुपये ७.५० लाखापेक्षा जास्त ते रुपये १२.५० लाख रकमेपर्यंत कर्ज मंजूरीकरीता पगाराचे खाते बँकेत असणे आवश्यक व एक जामिनदार घेणे आवश्यक (एक जामिनदार एका कर्जास जामिन राहू शकतो) तसेच जामिनकी हमी निधी दरहजारी रुपये ५/- प्रमाणे घेण्यात येईल. दिनांक ०५.०५.२००८ पूर्वी महापालिका सेवेत रुजू झालेल्या सभासदांकरीता (एन.सी.पी.एफ.) रुपये १२.५० लाख कर्ज मर्यादेपर्यंत मध्यम मुदत कर्ज मंजूर करण्याकरीता पगाराचे खाते बँकेत असणे आवश्यक अथवा एक जामिनदार घेणे आवश्यक (एक जामिनदार दोन कर्जास जामिन राहू शकतो) तसेच जामिनकी हमी निधी दरहजारी रुपये ५/- प्रमाणे घेण्यात येईल.

कर्ज घेणाऱ्या सभासदांनी पगाराचे खाते बँकेत उघडावे, हा निर्णय घेण्याचा मुख्य उद्देश थकबाकी असणाऱ्या कर्जाची वसुली करणे सोपे होईल. तसेच बँकेचे जकात संकलनाचे कामकाज बंद झाल्यामुळे जकात संकलन केंद्रांवरील चालू खात्यामध्ये असणारी सुमारे रुपये ५० कोटी रकमेची शिल्लक कमी झाली आहे. त्यामुळे पगाराचे खाते बँकेत घेतल्याने बचत खात्यामधील शिल्लक रकमेत वाढ होईल व कमी व्याज दराने बँकेला रक्कम प्राप्त होईल. इतर बँका ज्या सेवा सुविधा देत आहेत तशाच तुल्यबळ सेवा सुविधा आपल्या बँकेकडे उपलब्ध आहेत त्यामुळे सभासदांना आवाहन करण्यात येत आहे की, सभासदांनी त्यांच्या आर्थिक गरजा आपल्या बँकेमार्फतच पूर्ण कराव्यात.

**(ब) उच्च शैक्षणिक कर्ज :**

अहवाल साली उच्च शिक्षण कर्जाची रुपये १०.०० लाखाची मर्यादा रुपये २०.०० लाखापर्यंत करण्यात आली असून त्यावरील व्याज दर १० टक्के आहे. अहवाल सालात सभासदांनी त्यांच्या पाल्ल्यांकरीता रुपये ४,४५,५५०/- इतक्या रकमेच्या शैक्षणिक कर्जाचा लाभ घेतला आहे. पती-पत्नी दोघेही महानगरपालिकेत नोकरी करीत असल्यास त्यांना पाल्ल्यांच्या उच्च शिक्षणाकरीता उच्च शैक्षणिक कर्ज रुपये ४०.०० लाख मिळू शकते.

### (क) वाहन कर्ज :

बँक, सभासदांना नवीन चार चाकी वाहन कर्ज देते, परंतु नवीन चारचाकी वाहन कर्ज घेणे बऱ्याच सभासदांना शक्य होत नसते म्हणून बँकेच्या सभासदांचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीकोनातून सभासदांना जुन्या चार चाकी वाहनांसाठी कर्ज देण्यात येते. नवीन वाहनाच्या मूळ किंमतीवर ८० टक्के (इतर कर वगळून) पर्यंत कर्ज देण्यात येते. तसेच जुन्या वाहनाची सरकारमान्यताप्राप्त मुल्यांकनकाराने केलेल्या वाहनाच्या मुल्यांकन किंमतीच्या ८० टक्के (इतर कर वगळून) पर्यंत कर्ज देण्यात येते.

दिनांक १८.०२.२०१७ पासून वाहन कर्ज व्याज दर १० टक्के इतका आहे.

### (ड) तातडीचे कर्ज :-

सभासदांस तातडीच्या कर्जाची कमाल मर्यादा रुपये २.०० लाख करण्यात आली आहे. सभासदास सक्तीच्या ठेवीच्या शिलके एवढे रुपये १००/- च्या पटीमध्ये कमाल मर्यादेपर्यंत तातडीचे कर्ज मंजूर करण्यात येते. मात्र रुपये १०००/- पेक्षा कमी कर्ज मंजूर केले जात नाही. तातडीच्या कर्जाचा व्याज दर ११ टक्के आहे.

### (इ) गृहनिर्माण कर्ज :

दिनांक १९.०५.२०१७ पासून गृह कर्ज मर्यादा रुपये ७० लाख इतकी असून सभासदाच्या हाती प्राप्त होणाऱ्या रकमेमध्ये कोणत्याही ॲड बॅक चा फायदा न देता (तात्पुरत्या स्वरुपाचे भत्ते वगळता) नक्त वेतन ३० टक्के प्राप्त होत असल्यास त्या प्रमाणात कमाल कर्ज मर्यादेसापेक्ष गृहनिर्माण कर्ज मंजूर करण्यात येते.

पती व पत्नी दोघेही सभासद असतील तर त्यांना एकाच सदनिकेसाठी दोघांच्याही नांवे अनुज्ञेय असलेले गृह कर्ज मंजूर करण्यात येते. परंतु भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार एकाच सदनिकेवर रु.७० लाख मर्यादेपर्यंत कर्ज दिले जाईल. सभासदांना देण्यात येणाऱ्या गृह कर्जावरील व्याजाची आकारणी त्यांच्या कमी होत जाणाऱ्या गृह कर्जाच्या शिल्लक रक्कमेवर करण्यात येते. अर्जदारास एक खिडकी द्वारे सेवा देणे शक्य व्हावे, याकरीता बँकेच्या मुख्यालयातून गृह कर्ज प्रक्रिया करण्यात येत आहे. बँकेच्या जास्तीत जास्त सभासदांनी बँकेच्या गृहनिर्माण कर्ज सुविधेचा लाभ घेण्याकरीता संचालक मंडळाने वेळोवेळी गृह कर्ज व्याज दरात कपात केली असून सध्या कर्जाचा व्याज दर ८.५० टक्के आहे. ज्या सभासदांनी जास्त व्याज दरानुसार गृह कर्ज घेतले असल्यास त्या सभासदांना केवळ रुपये ३,०००/- (अधिक लागू असलेले कर) कन्व्हर्जन शुल्क भरणा करुन कमी व्याज दराच्या कर्जाचा फायदा घेणे शक्य होईल. तसेच दिनांक २०.०४.२०१८ रोजीच्या संचालक मंडळाच्या निर्णयानुसार, ज्या इमारतीमध्ये सभासद सदनिका घेत असेल ती इमारत वापर परवाना/इमारत पूर्णत्वाच्या दाखल्याच्या तारखेपासून २० वर्षापेक्षा जुनी असल्यास सदर इमारतीचे पुढील आयुष्यमान २० वर्षापेक्षा जास्त असल्याबाबत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचा दाखला सादर केल्यास सदर इमारतीत सदनिका खरेदीकरीता कर्ज मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### (ई) मॉर्गेज कर्ज :

दिनांक ०१.१०.२०१६ पासून मॉर्गेज कर्जाची मर्यादा रुपये २० लाख व व्याज दर १३ टक्के करण्यात आला आहे. तरी सभासदांनी सदर कर्ज सुविधेचा लाभ घ्यावा.

### (उ) विशेष मुदत कर्ज :

बँकेने सभासदांकरीता विशेष मुदत कर्ज रुपये १२ लाख कर्ज मर्यादेपर्यंत कर्ज नियमासापेक्ष उपलब्ध करुन दिले आहे. सदर कर्जाचा व्याज दर १३ टक्के इतका आहे. तरी सभासदांनी सदर सुविधेचा लाभ घ्यावा.

### (ऊ) उत्पादन क्षमता नसलेली मालमत्ता (एन.पी.ए.)

गतवर्षी बँकेची एकूण अनुत्पादक कर्जे रु. ३६.९८ कोटी झाली होती व त्याचे एकूण कर्जाशी ढोबळ एन.पी.ए. चे प्रमाण १.७२ टक्के होते व नक्त एन.पी.ए. निरंक होता. यावर्षी एकूण अनुत्पादक कर्ज रुपये ४५.६४ कोटी आहेत व त्याचे एकूण कर्जाशी ढोबळ एन.पी.ए. प्रमाण १.९५ टक्के आहे व नक्त एन.पी.ए. निरंक आहे. एकूण अनुत्पादक कर्ज रकमेच्या तुलनेत बँकेकडे पुरेसा जामिनकी हमी निधी उपलब्ध आहे. तसेच बँकेने वेळोवेळी बुडीत व अनिश्चित कर्जे निधीत पुरेशी तरतूद केलेली आहे.

मागील वर्षाच्या थकीत कर्जाची तुलना करता या आर्थिक वर्षात एन.पी.ए. रकमेत वाढ झाल्याचे दिसत आहे. सभासद दीर्घकाळ गैरहजर, मृत, काम करण्यास असमर्थ, सेवेतून काढून टाकलेले या कारणास्तव कर्जाची वसुली बंद होऊन कर्जे एन.पी.ए. झालेली आहेत. तरी बँकेमार्फत एन.पी.ए. कर्ज वसुलीकरीता शाखा स्तरावर, बँक मुख्यालयामार्फत महानगरपालिकेमध्ये तसेच थकबाकीदार सभासदांच्या कार्यालयात व घरी मोठया प्रमाणात पाठपुरावा करण्यात येतो. तसेच आवश्यक असेल तेथे थकबाकीदार सभासदांच्या कर्ज वसुलीकरीता कलम १०१ अंतर्गत कारवाई चालू आहे. महापालिका स्तरावर प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या विभागाकडून बँकेचे थकीत कर्ज वसुलीसाठी बँकेस सर्वतोपरी सहकार्य प्राप्त होत आहे. अहवाल वर्षात मृत सभासदांच्या वारसांकडून १०५ प्रकरणात रुपये ३,१६,६१,५८४/- एवढी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र सहकार कायदा १९६० नुसार ज्या कर्ज खात्यांची सर्व प्रयत्न करुनही वसुली होणे शक्य नसेल अशा कर्ज प्रकरणांची वैधानिक लेखा परिक्षकांनी खातरजमा केल्यानंतरच अशी खाती निर्लेखित करता येतात. या वर्षाचे लेखा तपासनीस मेसर्स बाटलीबॉय अँड पुरोहित यांनी १०२ कर्ज खाती व कर्ज रक्कम रुपये २,६८,१०,८३३.०५ (रुपये दोन कोटी अडुसष्ठ लाख दहा हजार आठशे तेहतीस आणि पैसे पाच फक्त) निर्लेखित करण्याचे प्रमाणित केले आहे. सदर कर्ज खाती निर्लेखित करण्यास सर्वसाधारण सभेत मंजूरी देण्याची विनंती करण्यात येत आहे.

### ७. गुंतवणूक :-

गतवर्षी गुंतवणुकीवरील व्याज रु.९८.९९ कोटी होते व दिनांक ३१.०३.२०१८ रोजी सदर व्याज रु. १०३.९४ कोटी प्राप्त झालेले आहे. सदर व्याज गतवर्षाशी तुलना करता रुपये ४.९५ कोटी जास्त प्राप्त झालेले आहे. सदर वाढ ५ टक्के आहे. गुंतवणूकीवरील सरासरी व्याज परतावा गतवर्षी ६.९३ टक्के होता तो यावर्षी ७.१९ टक्के झाला आहे. त्यामध्ये चालू वर्षी ३.७५ टक्के वाढ झाली आहे. बँकेकडे असलेले अतिरिक्त निधी म्युच्युअल फंड (लिक्विड फंड) टर्म मनी डिपॉझिट यासारख्या चांगले उत्पन्न देणाऱ्या पर्यायामध्ये बँकेचे गुंतवणूक सल्लागार मेसर्स एस्.बी.आय्. फंडस् मॅनेजमेंट प्रा.लि. यांच्या सल्ल्यानुसार गुंतविल्याने बँकेच्या गुंतवणूक उत्पन्नामध्ये वाढ झाली आहे.

अहवाल साल अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रुपये १४४५.८९ कोटी आहे. गतवर्षी बँकेची एकूण गुंतवणूक रुपये १४३८.३६ कोटी होती.

### ८. खेळते भांडवल :-

गतवर्षी रुपये ४०७१.१८ कोटी असलेल्या खेळत्या भांडवलामध्ये वाढ होऊन यावर्षी खेळते भांडवल रुपये ४१८४.७७ कोटी झाले आहे. खेळते भांडवलामध्ये गेल्या वर्षाच्या तुलनेत रुपये ११३.५९ कोटीने वाढ झाली आहे. सदर वाढ २.७९ टक्के आहे.

### ९. नफा विभागणी :-

अहवाल सालामध्ये बँकेस एकूण रुपये ८०.१८ कोटी नफा झाला आहे. सहकारी बँकांना आयकर लागू केल्याने बँकेला सदर नफ्यातून रुपये २९.५० कोटी आयकर अधिदान/तरतूद करावी लागल्याने, विभागणीसाठी रुपये ५०,६८,२३,६५१.२५ नफा शिल्लक उरतो. सदर नफ्यातून रुपये २,२३,८२,५४८.०० डिफर्ड टॅक्स उत्पन्न वळते करता उर्वरित एकूण रुपये ४८,४४,४१,१०३.२५ नफा विभागणीसाठी उपलब्ध आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ६६ नुसार प्रत्येक संस्थेने निव्वळ नफ्याच्या १/४ रक्कम राखीव निधीमध्ये वर्ग करावी लागते. तसेच कलम ६७ अन्वये लाभांशाचे जास्तीत जास्त दर १५ टक्के आहे व त्याप्रमाणे बँक सातत्याने लाभांश देत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम क्रमांक ५२ नुसार संस्थेच्या निव्वळ नफ्यातून समतोल नफा विभागणी निधी उभारावा लागतो व सदर निधीमध्ये भरणा केलेल्या भाग भांडवलाच्या २ टक्केपेक्षा अधिक नाही इतकी रक्कम तसेच अशा निधीमधील एकूण रक्कम भरणा केलेल्या भाग भांडवलाच्या ९ टक्के इतकी होईपर्यंत, अशा निधीत जमा करावी लागते. मात्र अहवाल वर्षात भाग भांडवल रकमेत रुपये १७.०१ कोटी रकमेची घट झाली असल्यामुळे ९ टक्केप्रमाणे पर्याप्त तरतूद बँकेकडे उपलब्ध आहे. त्यामुळे अहवाल सालात समतोल नफा विभागणी निधीमध्ये रक्कम वर्ग करण्यात आली नाही. बँकेच्या नवीन उपविधी क्रमांक ५४ नुसार सामाजिक

बांधिलकी निधी उभारणे आवश्यक असून सदर निधी हा देणग्या किंवा सामाजिक कार्यासाठी (उदा. मुख्यमंत्री निधीस मदत इ.) वापर करता येईल. बँकेचा नवीन उपविधी क्रमांक ५५ नुसार शिक्षण निधीमध्ये नफ्याच्या कमीत कमी ५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० टक्केपर्यंत रक्कम वर्ग करुन संचालक, सभासद व सेवक यांच्या प्रशिक्षणासाठी त्या निधीचा वापर करता येईल. या तरतूदी ध्यानात घेऊन नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्यास मान्यता देण्यासाठी संचालक मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

| | दि. ३१.०३.२०१८ रोजी असलेली शिल्लक (रुपये) | सन २०१६-२०१७ मध्ये करण्यात आलेली नफा विभागणी (रुपये) | सन २०१७-२०१८ करीता शिफारस (रुपये) |
|---|---|---|---|
| संचित निधी २५ टक्के | १,३२,२२,२९,४६६.७४ | १०,२४,२८,३६३.३१ | १२,११,१०,२७५.८१ |
| समतोल नफा विभागणी निधी | १५,६६,२६,०७६.०० | ६६,००,०००.०० | – |
| भाग भांडवलावरील लाभांश १५टक्के | – | २२,००,००,०००.०० | २२,८२,००,०००.०० |
| इमारत निधी | १३,७१,११,६६७.०० | – | २,६५,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | ४७,७५,२७,४७६.३५ | १,३५,००,०००.०० | १,००,००,०००.०० |
| सभासद स्वास्थ्य निधी | ४,०४,६७,६४१.५६ | २५,००,०००.०० | २,२५,००,०००.०० |
| आकस्मिक गोष्टींसाठी निधी | १,४२,६५,०१५.४० | २५,००,०००.०० | २५,००,०००.०० |
| शिक्षण निधी | ७,३६,७३,१००.१३ | २,०५,००,०००.०० | २,४३,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | १,३०,२०,८५६.४४ | २५,००,०००.०० | ५०,००,०००.०० |
| अस्थिर गुंतवणूक निधी | ५,९८,०३,७२८.०० | १,२५,००,०००.०० | २,००,००,०००.०० |
| संगणक निधी | १०,९२,०६,५३६.६३ | १,२५,००,०००.०० | १,३३,००,०००.०० |
| दुरुस्ती व नुतनीकरण निधी | ६,९६,१९,९८९.२८ | १,००,००,०००.०० | ७५,००,०००.०० |
| सामाजिक बांधिलकी निधी | ५०,५७,७५०.०० | १६,००,०००.०० | १०,००,०००.०० |
| निवृत्त सभासद कल्याण निधी | १,२१,४९,४१६.५३ | २५,००,०००.०० | २५,००,०००.०० |
| शिल्लक नफा | – | ८५,०८९.९२ | ३०,८२७.४४ |
| | २,४९,०७,५८,६२०.०६ | ४०,९७,१३,४५३.२३ | ४८,४४,४१,१०३.२५ |

## १०. सक्तीची बचत ठेव :-

अहवाल सालामध्ये सक्तीच्या बचत ठेवी रुपये १०२१.०८ कोटी झाल्या असून गेल्या वर्षाच्या तुलनेत सदर ठेवी रुपये ३८.२८ कोटीने वाढ झाल्याचे दिसते. सदर वाढ ३.८९ टक्के आहे. यावर्षी सक्तीच्या ठेवींवर ७.१३ टक्के दराने व्याज देण्यात आले आहे. सदर व्याज दिनांक ०१.०४.२०१८ रोजी सभासदांच्या बँकेतील बचत खात्यात जमा करण्यात आले.

## ११. लाभांश :-

सहकार खात्याने जास्तीत जास्त १५ टक्के दराने लाभांश देण्याची मर्यादा निश्चित केली असल्याने बँक सदर मर्यादेनुसार जास्तीत जास्त लाभांश देत आली आहे. सहकारी बँकांना आयकर लागू केल्याने यावर्षी बँकेस एकूण रु.२९.५० कोटी आयकर अधिदान/तरतूद करावी लागली आहे. तरी देखील साल २०१७-२०१८ साठी संचालक मंडळाने १५ टक्के दराने लाभांश देण्याची शिफारस वार्षिक सर्वसाधारण सभेकडे केली आहे. त्यास आपण मान्यता द्याल, याची मला खात्री आहे.

## जकात संकलन :-

दिनांक ०१.०७.२०१७ पासून सर्व देशभरामध्ये जी.एस.टी. कायदा लागू करण्यात आला. त्यामुळे बँकेकडील जकात संकलनाचे

काम बंद झाले. दिनांक ३०.०६.२०१७ रोजी ८५ कर्मचारी जकात संकलन केंद्रांवर कार्यरत होते. जकात संकलनाचे कामकाज बंद झाल्यामुळे सदर कर्मचारी बँकेकडे अतिरिक्त झाले. अतिरिक्त कर्मचाऱ्यांस बँकेच्या मुख्य कार्यालयातील विविध विभागात तसेच ज्या शाखेत कर्मचारी कमी होते त्या शाखेत आणि वर्षभरात निवृत्त/स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचारी/अधिकाऱ्यांमुळे रिक्त झालेल्या जागा भरुन सामावून घेण्यात आले आहे.

सन २०१६-२०१७ करीता महापालिकेकडून बँकेस जकात संकलन कमिशनपोटी देय असलेल्या रकमेमधून महापालिकेने सन २०११ ते २०१६ या कालावधीतील धनादेश व डिमांड ड्राफ्टद्वारे जकात संकलन केलेल्या रकमेवरील कमिशनची एकूण रुपये ५.७४ कोटी रक्कम वजावट करुन जकात कमिशन अधिदान केले आहे. त्यामुळे बँकेस सदर वर्षासाठी महापालिकेने वजावट केलेली रक्कम नफा तोटा पत्रकामध्ये दाखवून तेवढा खर्च दाखविणे क्रमप्राप्त आहे. मात्र सदर रक्कम जरी नफा तोटा पत्रकामध्ये दाखवून निर्लेखित करीत असू तरी बँक सदर रक्कम मिळविण्याकरीता महापालिका वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत यासंदर्भात पाठपुरावा सुरु ठेवणार आहे. महापालिकेमार्फत धनादेश व डिमांड ड्राफ्टद्वारे सन २०११ ते २०१६ या कालावधीतील अधिदान झालेले जकात कमिशन रुपये ५.७४ कोटी नफा तोटा पत्रकात नांवे टाकण्यात आले आहे.

तसेच आर्थिक वर्षं २०१७-२०१८ मध्ये पहिल्या तिमाहीत बँकेने जकात कमिशनपोटी अर्ध्या टक्क्याने गणना करुन महापालिकेस देयके सादर करण्यात आली आहेत. परंतु महापालिकेकडून ०.२५ टक्के कमिशन मिळणे अपेक्षित वाटत असल्याने नफा तोटा पत्रकामध्ये जकात कमिशनची रक्कम ०.२५ टक्केप्रमाणे नमूद करण्यात आली आहे. मात्र ०.५० टक्केने गणना केलेल्या जकात कमिशनच्या रकमेवर १५ टक्केने सेवा कर अगोदरच भरणा केलेला आहे. त्यामुळे जी रक्कम मिळणार नाही त्याचेवर बँकेने अगोदरच जकात कमिशनपोटी सेवा कर रुपये ४० लाख इतकी रक्कम भरलेली आहे. त्यापैकी रुपये २० लाख इतकी रक्कम नफा तोटा पत्रकात खर्च म्हणून दाखवून निर्लेखित करीत आहोत. बँकेतर्फे जकात कमिशनची रक्कम अर्ध्या टक्क्याने मिळविण्याकरीता महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत पाठपुरावा सुरु ठेवणार आहोत.

## १२. हिशेब तपासणी :-

### (अ) कंकरंट हिशेब तपासणी :-

साल २०१७-२०१८ या वर्षाकरीता मेसर्स महावीर गांधी अँड असोसिएटस्, सनदी लेखापाल यांची कंकरंट हिशेब तपासनीस म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी कंकरंट लेखा तपासणीचे काम पूर्ण करुन त्यांचा अहवाल सादर केला आहे. कंकरंट हिशेब तपासनीस यांनी तपासणी कालावधीमध्ये बँकेस केलेल्या बहुमोल सूचनांबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे. कंकरंट हिशेब तपासणी सनदी लेखापालाकडून होत असल्याने, अंतर्गत हिशेब तपासणीसांची नियुक्ती करणे बँकेने बंद केले आहे.

### (ब) वैधानिक हिशेब तपासणी :-

साल २०१७-२०१८ या वर्षाकरीता बँकेने नियुक्त केलेले मे. बाटलीबॉय अँड पुरोहित या वैधानिक लेखापरिक्षकांनी आपल्या बँकेचे लेखातपासणीचे काम पूर्ण केले असून त्यांनी बँकेस ‘अ’ लेखापरिक्षण वर्ग प्रदान केला आहे. मे.बाटलीबॉय अँड पुरोहित यांनी लेखातपासणी कालावधीत बँकेला केलेल्या बहुमोल सूचना व मार्गदर्शनाबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे.

### (क) भारतीय रिझर्व्ह बँकेची तपासणी –

भारतीय रिझर्व्ह बँकेचे उप-महाव्यवस्थापक श्री. संजय कुमार व व्यवस्थापक श्री. बी. किरण यांनी आपल्या बँकेचे दिनांक ०१.०४.२०१५ ते ३१.०३.२०१७ या कालावधीची लेखा तपासणी केलेली आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाला असून बँकेचे कामकाज समाधानकारक असल्याचे नमूद केले आहे.

## १३. शिष्यवृत्त्या :-

विविध मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून पहिल्या तीन क्रमांकाने गुणवत्ता यादीत येणारे, व्यावसायिक परिक्षा उदा. एम.बी.बी.एस., बी.ए.एम. एस., बी.एच.एम.एस., बी.व्ही.एस.सी., सी.ए., सी.एस., आय.सी.डब्ल्यू.ए. उत्तीर्ण होणाऱ्या सभासदांच्या पाल्ल्यांचा तसेच

व्यावसायिक परिक्षा उदा. एल.एल.बी., बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, बॅचलर ऑफ फाईन आर्टस्, बी.ई. (पदवी), बी.टेक यामधून ७० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या सभासदांच्या पाल्ल्यांचा, त्याचप्रमाणे स्पर्धात्मक परिक्षा उदा. आय.ए.एस., आय.पी.एस., आय.आर.एस. मधून उत्तीर्ण होणाऱ्या सभासदांच्या पाल्ल्यांचा, तसेच इयत्ता १० वीच्या परिक्षेत ९० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण, इयत्ता १२ वी च्या परिक्षेत ८५ टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या सभासदांच्या पाल्ल्यांचा, तसेच सभासदांच्या अपंग पाल्ल्यांसाठी इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परिक्षेत ८० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्यांचा (अपंगत्वाच्या नॉर्म्सप्रमाणे ५० टक्के व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्यांचा) व इयत्ता ५ वी व ८ वी च्या परिक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा, होमी भाभा सायन्स सेंटर घेत असलेल्या परिक्षेमध्ये सुवर्ण, रजत पदक प्राप्त केलेल्या सभासदांच्या पाल्ल्यांचा तसेच एल.जी.एस., एल.एस.जी.डी. परिक्षेत संपूर्ण भारतामधून प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या सभासदांचा, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (एम्.पी.एस्.सी.) च्या क्लास १ अधिकाऱ्यांची परिक्षा उत्तीर्ण व केंद्रीय लोकसेवा आयोग (यु.पी.एस्.सी.) परिक्षेत उत्तीर्ण सभासद व सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव करण्यात येतो.

तसेच राज्यस्तरीय, अखिल भारतीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध खेळांच्या स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक स्पर्धेमध्ये प्रथम तीन क्रमांक वा सुवर्ण, रौप्य वा कांस्य पदक प्राप्त करणाऱ्या सभासदांचा व सभासदांच्या पाल्ल्यांचा गुणगौरव करण्यात येत आहे.

इयत्ता ५ वी व ८ वी च्या परिक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त केलेल्या, होमी भाभा सायन्स सेंटर घेत असलेल्या परिक्षेमध्ये सुवर्ण, रजत पदक प्राप्त केलेल्या सभासदांच्या पाल्ल्यांचा प्रत्येकी रु. १,५००/- व अन्य पाल्ल्यांना व सभासदांना प्रत्येकी रुपये २,०००/- संबंधित सभासदांच्या बचत खात्यामध्ये जमा करुन आणि प्रशस्तिपत्रक देऊन संचालक मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. चालू आर्थिक वर्षात मिळून एकूण १६९ विद्यार्थी व सभासदांना रुपये ३,२८,०००/- एवढया रकमेचे अधिदान करण्यात आले. तसेच दिनांक २२.०६.२०१८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत, शिष्यवृत्ती रकमेत रुपये ५००/- इतकी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे रुपये १,५००/- ऐवजी रुपये २,०००/- व रुपये २,०००/- ऐवजी रुपये २,५००/- शिष्यवृत्ती रक्कम यावर्षीपासून संबंधितांस देण्यात येईल.

मागील वर्षी कार्यक्रमाच्या समारोपापर्यंत उपस्थित राहिलेल्या सभासद व त्यांची पाल्ल्ये यांच्यासाठी लॉटरी पध्दतीने गिफ्ट व्हाऊचर जाहीर करण्यात आले होते. गुणगौरव कार्यक्रमास उपस्थित राहून सत्कार करण्यात येणाऱ्या सभासद व पाल्ल्यांना प्रोत्साहन मिळून त्यांचा यथोचित गौरव झाल्याचे बँकेस समाधान मिळाले.

तरी संबंधीत सभासदांनी त्यांच्या पाल्ल्यांच्या तसेच संबंधितांच्या गुणपत्रिकेसह दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ पर्यंत जवळच्या शाखा कार्यालयात आपला भ्रमण/ दूरध्वनी क्रमांक नमूद करुन अर्ज सादर करावा जेणेकरुन त्यांचा उचित गुणगौरव करणे शक्य होईल.

### १४. सभासद कल्याण निधीमधून मिळणाऱ्या बक्षिस रकमेबाबत :-

सभासद कल्याण निधीमधून सभासदास त्याच्या निवृत्तीनंतर सभासदत्वाच्या पहिल्या ५ वर्षाकरीता रुपये ५,०००/- व उर्वरित प्रत्येक सभासदत्व वर्षासाठी रुपये ४००/- यानुसार बक्षिस रक्कम देण्यात येते. अहवाल वर्षामध्ये सभासद कल्याण निधीमधून सभासदांना बक्षिस रक्कमेपोटी रुपये ४.७३ कोटीचे अधिदान करण्यात आले आहे. दिनांक २२.०६.२०१८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये, पहिल्या ५ वर्षाकरीता रुपये ५,०००/- व उर्वरित प्रत्येक सभासदत्व वर्षासाठी रुपये १००/- ने वाढ करुन रुपये ४००/- ऐवजी रुपये ५००/- यानुसार बक्षिस रक्कम देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

### १५. तातडीची आर्थिक मदत :-

सभासद मृत्यू पावल्यास त्याच्या कुटुंबास रुपये ४,०००/- इतकी आर्थिक मदत देण्यात येते. अहवाल साली ४१८ सभासदांच्या कुटुंबियास रुपये १६,७४,५००/- इतकी मदत देण्यात आली. दिनांक २२.०६.२०१८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत सभासद मृत्यू पावल्यास त्याच्या कुटूंबास देण्यात येणाऱ्या रकमेत रुपये १,०००/- ने वाढ करुन रुपये ४,०००/- ऐवजी रुपये ५,०००/- आर्थिक मदत देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

## १६. सभासद स्वास्थ्य निधी :-

अहवाल साली सदर निधीमधून बँकेच्या २१ सभासदांना रुपये ३,३५,०००/- या रकमेची मदत मंजूर करुन सदर रकमेचे अधिदान करण्यात आले आहे. सभासद स्वास्थ्य निधीमधून हृदय शस्त्रक्रिया (अॅन्जोप्लास्टी), मुत्रपिंडरोपण शस्त्रक्रिया, कर्करोग व हृदयाची बायपास सर्जरी या चार आजारांकरीता सभासदास रुपये २५,०००/- व इतर आजारांकरीता रुपये १५,०००/- आर्थिक मदत देण्यात येते. सभासदांवर अवलंबून असणाऱ्या कुटूंबियांकरीता उपरोक्त नमूद केलेल्या चार आजारांकरीता रुपये २०,०००/- व इतर आजारांकरीता रुपये १०,०००/- आर्थिक मदत देण्यात येते.

महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांसाठी गट आरोग्य विमा योजनेअंतर्गत देण्यात येणारी मदत विमा योजनेचे नुतनीकरण न झाल्याने देण्याचे बंद केल्याने बँकेकडून सभासदास वैद्यकीय मदत देण्याबाबत माहिती प्राप्त करण्यात आली असता प्राप्त माहितीच्या आधारे सभासदास वैद्यकीय मदतीपोटी देण्यात येणारी अंदाजित रक्कम वैद्यकीय निधीची उपलब्धता लक्षात घेता व्यवहार्य ठरत नसल्याचे निदर्शनास आले. याकरीता दिनांक ३०.०५.२०१८ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेत महापालिकेस गट आरोग्य विमा योजना अंमलात येण्यापूर्वीच्या महापालिका कर्मचारी वैद्यकीय मदत योजनेच्या अनुषंगाने बँकेच्या तत्कालीन सभासद स्वास्थ्य निधी नियमांतर्गत वैद्यकीय मदत देण्यास मंजूरी देण्यात आली आहे. दिनांक ०१.०८.२०१७ नंतरच्या वैद्यकीय खर्चापोटीच्या अर्जदारास सदर योजनेचा लाभ होणार आहे. संचालक मंडळाने त्याकरीता सभासद स्वास्थ्य निधीमध्ये अहवाल वर्षी झालेल्या नफ्यातून रुपये २.२५ कोटी इतकी रक्कम निधीमध्ये वर्ग करणेबाबत शिफारस केलेली आहे.

## १७. संकट निवारण निधी :-

सभासदांना नैसर्गिक आपत्तीत सापडल्यामुळे तसेच आगीमुळे किंवा दंगलीमुळे झालेल्या नुकसानीकरीता रु.१०,०००/- किंवा प्रत्यक्ष झालेल्या आर्थिक नुकसानाची रक्कम यापैकी कमीत कमी रकमेची आर्थिक मदत देण्यात येते. तसेच गंभीर किंवा प्रदीर्घ आजारामुळे आलेले अपंगत्व किंवा कमकुवत झाल्याने पालिकेच्या नोकरीमधून काढून टाकल्यास तसेच नोकरीत असताना कार्यालयीन वेळेत सभासदाचा अपघाती मृत्यू झाल्यास रुपये २५,०००/- रकमेची आर्थिक मदत देण्यात येते. तसेच सभासद वास्तव्य करीत असलेल्या खाजगी किंवा महापालिकेची इमारत कोसळून काही दुर्घटना झाल्यास व सदर दुर्घटनेमध्ये सभासद मृत पावल्यास रुपये २५,०००/- व दुर्घटनेमध्ये जखमी झाल्यास सभासदास रुपये २०,०००/- इतकी आर्थिक मदत नियमांसापेक्ष देण्यात येते. अहवाल साली सदर मदतीसाठी एकही अर्ज बँकेस प्राप्त झाला नाही.

## १८. सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना बँकेच्या अंतिम निकाली हिशेबाचे अधिदान धनादेश, बचत खाते व ई.सी.एस./एन.ई.एफ.टी.द्वारे सेवानिवृत्तीच्या दिवशी देण्याबाबत :

सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना बँकेतर्फे शाखा कार्यालयात शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह म्हणून भिंतीवरील घडयाळ देण्यात येत असे. परंतु आता घडयाळाऐवजी सभासदांना सन्मान चिन्ह (ट्रॉफी) व सोबत निवृत्त सभासदांना मिळणाऱ्या (Cash Assistance) रकमेचे प्रमाणपत्र देण्यात येते व त्यांचा यथोचित सत्कार करण्यात येतो. महापालिकेच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्या बँकेच्या सभासदांचे अंतिम निकाली हिशेब त्यांच्या स्वत:च्या जमा रकमेतून मंजूर होतात अशा सभासदांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशीच अंतिम निकाली हिशेबांचे अधिदान धनादेश, ई.सी.एस., एन.ई.एफ.टी. व बचत खात्याद्वारे करण्यात येते. अहवाल सालामध्ये अशा एकूण २८९२ सभासदांना सेवानिवृत्तीच्या दिवशीच अंतिम निकाली हिशेबांचे अधिदान करण्यात आले. सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांनी त्यांच्या शेअर्स खाती जमा असलेली रक्कम काढून न घेता 'विशेष ठेव' म्हणून बँकेतच ठेवावी. सदर 'विशेष ठेव' रकमेवर त्या कालावधीत बँकेत लागू असलेल्या महत्तम व्याज दरापेक्षा एक टक्का अधिक व्याज दर देण्यात येईल. तसेच सक्तीची ठेव खाती असलेली रक्कम काढून न घेता 'सक्तीची ठेव' म्हणून बँकेत ठेवावी व सक्तीच्या ठेवीवरील व्याज दराचा लाभ घ्यावा. तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना विनम्र आवाहन करण्यात येते की, सेवानिवृत्तीच्या वेळी महापालिकेकडून मिळणारी रक्कम आपल्या बँकेत ठेवून आकर्षक व्याज दराचा लाभ घ्यावा. ठेवींवरील व्याज आपण रहात असलेल्या नजिकच्या कोणत्याही बँकेत एन.ए.सी.एच., एन.ई.एफ.टी. द्वारे जमा करण्यात येईल.

### १९. पेन्शन खाते सुविधा :-

आपल्या बँकेला महापालिकेने सभासदांची पेन्शन अधिदान करणाऱ्या बँकांमध्ये समावेश करावा म्हणून संचालक मंडळ प्रयत्नशील होते. आता आपल्या बँकेने स्वत:ची आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. सुविधा सुरु केल्याने महापालिकेने त्यांच्या निवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन खाते आपल्या बँकेत उघडण्याची परवानगी दिली आहे व त्याप्रमाणे बँकेने सदर सुविधा त्वरीत सुरु केली ज्यामुळे आता बँक सभासदास सेवानिवृत्तीनंतरही बँकेची सेवा प्राप्त झाली आहे. अहवाल वर्षात ९९७ पेन्शन खाती सुरु करण्यात आली आहेत. सदर सेवेचा लाभ सर्व सेवानिवृत्त सभासदांनी घ्यावा, ही विनंती.

### २०. पॅनकार्ड सुविधा :

बँक सभासदांना पॅनकार्ड सुविधा देत आहे. सदर योजनेअंतर्गत ज्या सभासदांना/ग्राहकांना/त्रयस्थ व्यक्तींना पॅनकार्ड हवे असल्यास तसेच जुने कार्ड बदलून किंवा गहाळ झालेले असल्यास नवीन घ्यावयाचे असल्यास बँकेने रुपये १०६/- इतके शुल्क घेऊन सदर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अशा सभासद/ग्राहक/त्रयस्थ व्यक्तींचा विनंती अर्ज शाखा कार्यालयांमार्फत यु.टी.आय. इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी अँण्ड सर्व्हिसेस लि. या कंपनीकडे पाठविण्यात येतो. बँकेच्या सर्व सभासदांनी/ग्राहकांनी सदर सुविधेचा लाभ घ्यावा.

### २१. महापालिका सहकार्य :-

बृहन्मुंबई महानगरपालिका आणि आपली बँक यांचे एक अतूट नाते आहे. मा.महापालिका आयुक्त, मा.अतिरिक्त आयुक्त, मा.सह आयुक्त, उपायुक्त, करनिर्धारक व संकलक, प्रमुख लेखापाल (वित्त), प्रमुख लेखापाल (कोषागार), मानव संसाधन विभाग, सहाय्यक आयुक्त, विधी अधिकारी, महापालिका जनसंपर्क अधिकारी, इतर सर्व खाते प्रमुख व त्यांचे विभागातील कर्मचारी आणि इतर महापालिका अधिकारी यांनी वेळोवेळी बँकेस दिलेल्या सहकार्याबद्दल संचालक मंडळ त्यांचे ऋणी आहे.

### २२. उल्लेखनीय घटना :-

सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता महाराष्ट्र शासनाच्या 'सहकार महर्षी' पुरस्कारासाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांमधून नामांकनासाठी आपल्या बँकेची निवड झाली आहे.

१) 'बँको पुरस्कार २०१७' पगारदार सहकारी बँका या गटामध्ये प्रथम क्रमांक

२) दि महाराष्ट्र एम्प्लॉईज बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., मुंबई महाराष्ट्र राज्य यांचेतर्फे रुपये ३५० कोटींच्यावर ठेवी या गटात सन २०१६-२०१७ करीता प्रथम क्रमांक

३) दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि. यांचेतर्फे 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार – सन २०१७' चा 'पगारदार सहकारी बँकेच्या गटातून तृतीय क्रमांक

४) बँकींग फ्रंटीअर्स या संस्थेतर्फे सन २०१७ करीता पगारदार बँकांच्या गटामध्ये ४ पुरस्कार प्राप्त –

(१)सर्वोत्कृष्ट मोबाईल ॲप पुरस्कार

(२)सर्वोत्कृष्ट सी.बी.एस. अपग्रेडेशन पुरस्कार

(३)सर्वोत्कृष्ट डाटा सिक्युरिटी पुरस्कार

(४)सर्वोत्कृष्ट इ-पेमेंट फेज-१ पुरस्कार

५) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई तर्फे पगारदार बँक गट – प्रथम पुरस्कार सन २०१५-२०१६ व द्वितीय पुरस्कार सन २०१६-२०१७.

## २३. शाखांमधील स्पर्धात्मक कामकाज :-

बँकेची २२ शाखा कार्यालये असून ग्राहकास उत्तम सेवा प्राप्त व्हावी व कर्मचाऱ्यांमध्ये सेवा प्रदान करण्यात गुणात्मक वृध्दी व्हावी, शाखांमध्ये स्पर्धात्मक कामकाज व्हावे म्हणून संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०१२-१३ पासून शाखानिहाय कामकाजाचे, वस्तूनिष्ठ मुल्यांकन करुन सर्वोत्कृष्ट शाखेस प्रथम पारितोषिक देणे व दुसऱ्या क्रमाकांवरील शाखेस 'प्रोत्साहनपर पारितोषिक' देण्यास सुरुवात केली असून २०१७-२०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरीता सर्वोत्कृष्ट शाखा म्हणून बँकेच्या नानाचौक शाखेला प्रथम पारितोषिक तर प्रोत्साहनपर पारितोषिक बँकेच्या देवनार शाखेला देण्यात आले आहे. संबंधीत शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांचे मी अभिनंदन करु इच्छितो. त्याचप्रमाणे ठेवी वाढीसाठी आणि एन.पी.ए. कमी करण्यासाठी सुध्दा वैयक्तिक पातळीवर कर्मचारी/अधिकारी यांना पारितोषिक देण्याची योजना राबविण्यात येत आहे.

## २४. अध्यक्ष :-

अहवाल वर्षात सन्माननीय महापालिका आयुक्त व बँकेचे अध्यक्ष श्री.अजोय मेहता यांच्या प्रशासकीय सेवेचा व प्रदीर्घ अनुभवाचा बँकेच्या संचालक मंडळास तसेच प्रशासनास अमूल्य लाभ झाला आहे. संचालक मंडळ त्याबद्दल त्यांचे अत्यंत ऋणी आहे. यापुढे देखील त्यांच्या नेतृत्वाखाली बँक निश्चितच नेत्रदीपक प्रगती करेल व त्यांचे बहुमूल्य मार्गदर्शन प्राप्त होत राहील, असा संचालक मंडळास दृढ विश्वास आहे.

## २५. उपाध्यक्ष :-

अहवाल वर्षात मा. महापालिका अतिरिक्त आयुक्त व बँकेचे उपाध्यक्ष डॉ.संजय मुखर्जी यांच्या प्रशासकीय सेवेचा व प्रदीर्घ अनुभवाचा बँकेच्या संचालक मंडळास व प्रशासनास अमूल्य लाभ झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेने चांगल्या प्रकारे प्रगती साधली असून संचालक मंडळ व प्रशासन यांना त्यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले आहे. संचालक मंडळ त्याबद्दल त्यांचे अत्यंत ऋणी आहे.

## २६. संचालक मंडळ :-

सभासदांचे हित सतत नजरेसमोर ठेवून त्यांना उत्तम ग्राहक सेवा आणि अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न संचालक मंडळ करीत असून त्या दृष्टीने निरंतर प्रयत्न चालू आहेत. बँकेला एक वेगळी दिशा देण्याच्या दृष्टीने प्रशासकीय सुधारणा, कार्यालये आणि शाखांचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, कोअर बँकींग, ए.टी.एम. स्थापित करणे, नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करुन अद्ययावत बँकींग सुविधा प्रदान करणे इत्यादी प्रकल्प कार्यान्वित केले असून नजिकच्या काळात बँकेची पत-प्रतिष्ठा वाढून बँकेचे वेगळेपण जाणवेल या दृष्टीने संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. अहवाल साली संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा झाल्या.

## २७. कर्जव्यवहार समिती :-

सभासदांची कर्जे मंजूर करण्याचे आणि त्यासंबंधीच्या कामकाजाचे निर्णय घेण्याचे अधिकार संचालक मंडळाने या समितीस दिले आहेत. अहवाल सालात समितीच्या १२० सभा झाल्या.

## २८. सर्वसाधारण कामकाज समिती :-

बँकेच्या आर्थिक व्यवहारासंबंधीचे सर्व प्रस्तावावर या समितीत चर्चा होऊन रुपये ५०,०००/- रकमेपर्यंतचे प्रस्तावास मान्यता देऊन उर्वरित प्रस्तावांची संचालक मंडळास शिफारस केली जाते. अहवाल सालात समितीच्या १२१ सभा झाल्या.

## २९. संगणक, सल्लागार, विधी व लेखा परिक्षण समिती :-

बँकेत संपूर्ण संगणकीकरणाच्या दृष्टीने उपयुक्त असे निर्णय घेणे तसेच बँकेचे ध्येय-धोरण, विकास आराखडा ठरविणे, कायदा विषयक बाबी हाताळणे,लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करुन पूर्तता अहवाल मागविणे या जबाबदाऱ्या या समितीवर सोपविण्यात आल्या आहेत. अहवाल साली या समितीच्या एकूण १० सभा झाल्या.

**३०. कर्मचारी समिती :-**

कर्मचाऱ्यांसंबंधीच्या विषयावर निर्णय घेण्याचे अधिकार या समितीचे असून अहवाल वर्षात या समितीच्या एकूण ७ सभा घेण्यात आल्या.

**३१. श्रध्दांजली :-**

अहवाल वर्षात जे सभासद व बँक कर्मचारी मृत झाले त्यांच्याबद्दल संचालक मंडळ दु:ख प्रकट करीत असून मृत सभासद, मृत नामधारी सभासद व मृत बँक कर्मचारी यांच्या कुटुंबियांच्या दु:खात संचालक मंडळ व समस्त कर्मचारीवृंद सहभागी आहे.

**३२. सदिच्छा :-**

अहवाल साली बँकेचे जे सभासद व कर्मचारी निवृत्त झाले त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो अशी सदिच्छा संचालक मंडळातर्फे मी व्यक्त करीत आहे.

**३३. ऋणनिर्देश :-**

बँकेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, सह-निबंधक, जिल्हा उप-निबंधक व उप-निबंधक 'ए' विभाग व त्यांचे कार्यालयातील कर्मचारी/अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स फेडरेशन, दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन, बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन, भारतीय बँक संघ, नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स, नवी दिल्ली, सहकारी संस्था, नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., क्लिअरींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., अध्यक्ष, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन, महाराष्ट्र एम्प्लॉईज बँक्स् को-ऑपरेटिव्ह असोसिएशन मुंबई, मेसर्स सीएज टेक्नॉलॉजी लि., मेसर्स आय.बी.पी.एस., मेसर्स एस.बी.आय. फंडस् मॅनेजमेंट प्रा.लि., आय.डी.बी.आय. बँक (सायन शाखा), मेसर्स स्कोअरटेक, मेसर्स दाराशॉ आणि कं.प्रा. लि., महापालिकेच्या विविध कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच कळत नकळत अहवाल सालात ज्यांचे बँकेला सहकार्य व मौखिक मार्गदर्शन लाभले त्या सर्वांचे संचालक मंडळाच्या वतीने मी आभार मानतो. संचालक मंडळाच्या सर्व सदस्यांकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल मी व्यक्तिश: त्या सर्वांचा आभारी आहे.

संस्थेची प्रगती सभासद, खातेदार, संस्थेचे व्यवस्थापन तसेच संस्थेच्या हितचिंतकांवर अवलंबून असते. या प्रगतीमध्ये कर्मचारी/अधिकारी यांची निष्ठा, त्यांनी सभासदांना दिलेली सेवा तसेच व्यवस्थापनास दिलेला सहयोगही महत्वाचा आहे. कर्मचारी व व्यवस्थापन यांचे संबंध सलोख्याचे आहेत. बँकेच्या कामकाजात कर्मचारी मनापासून काम करीत आहेत व यापुढेही करतील असा विश्वास वाटतो. संचालक मंडळ बँकेच्या दिवसेंदिवस होत असलेल्या प्रगतीबद्दल सभासद, खातेदार, हितचिंतक तसेच बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे ऋणी आहे.

संचालक मंडळाच्या वतीने व वैयक्तिकरित्या मी आपले पुनश्च आभार व्यक्त करतो.

**आपला स्नेहांकित,**

**( मिलिन सावंत )**
**कार्याध्यक्ष**